**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत महाराष्ट्राचे ३१वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आज शपथ घेणार, मुंबईत आझाद मैदानावर शपथविधीसाठी तयारी पूर्ण

- अदानी लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीतर्फे चौकशी करण्याची विरोधकांची मागणी

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई महापालिकेची जय्यत तयारी

- फ्रान्सच्या राष्ट्रीय संसदेत अविश्वास ठराव मंजूर झाल्याने प्रधानमंत्री मिशेल बार्नियर यांचं सरकार अवघ्या तीन महिन्यात कोसळलं

**आणि**

- पुरुषांच्या हॉकी ज्युनियर आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानला नमवून भारतीय संघाने पटकावलं विजेतेपद

**<><><><><>**

महाराष्ट्राचे ३१वे मुख्यमंत्री म्हणून भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस आज शपथ घेणार आहेत. मुंबईत आझाद मैदानात आज संध्याकाळी साडे पाच वाजता होणाऱ्या या समारंभात राज्यपाल सी. पी.

राधाकृष्णन, फडणवीस यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीशासित राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित राहणार आहेत.

या शपथविधी सोहळ्यासाठी आझाद मैदानावर तयारी करण्यात आली आहे. मैदान आणि सभोवतालचा परिसर सुशोभित करण्यात आला आहे. या शपथविधी सोहळ्यासाठी देशभरातून भाजपाचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आज सकाळी मुंबईत दाखल झाले आहेत. दरम्यान, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या नेत्यांनी काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे सत्ता स्थापनेचा दावा केला. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह मित्रपक्षांच्या एकूण २३७ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र यावेळी सादर करण्यात आलं.

**<><><><><>**

झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालच्या इंडिया आघाडीच्या सरकारच्या विस्तारित मंत्रिमंडळाच्या सदस्यांचा शपथविधी आज रांची इथं होणार आहे. राज्यपाल संतोषकुमार गंगवार अकरा मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. त्यात झारखंड मुक्ती मोर्चाचे चार, काँग्रेसचे चार, तर राष्ट्रीय जनता दलाच्या एका मंत्र्याचा समावेश असेल.

**<><><><><>**

अदानी लाचखोरी प्रकरणी आज संसदेच्या परिसरात विरोधी पक्षांनी जोरदार निदर्शने केली. विरोधी पक्ष नेता काँग्रेस खासदार राहुल गांधी

यांच्यासह राजद, डीएमके आदी प्रमुख विरोधी पक्षांनी निदर्शनं केली या प्रकरणाची संसदेच्या संयुक्त समितीतर्फे चौकशी करण्याची मागणी यावेळी विरोधकांनी केली.

राज्यसभेत आज परदेशातून देशहितावर होत असलेल्या हल्ल्यांचा मुद्दा भाजपा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी शून्य प्रहरात उपस्थित केला. त्यावर राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी हा गंभीर मुद्दा असल्याचं सांगत त्यावर अधिक वेळ चर्चा करण्याची सूचना केली. त्यावर विरोधी पक्षाच्या खासदारांनी जोरदार आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गोंधळात राज्यसभेचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्यानंतर पुन्हा कामकाजाला सुरुवात झाली.

दरम्यान, लोकसभेत आज नागरी हवाई वाहतूक मंत्री किनजारापु राम मोहन नायडू यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं की, देशात सध्या १५७ विमानतळं कार्यरत असून २०१४ मध्ये केवळ ७४ विमानतळंच कार्यरत होती. सरकार देशात विमानतळाच्या जाळ्याला महत्त्व देत असून सध्या दिवसाला पाच लाख जण देशातंर्गत प्रवास करत असल्याचंही त्यांनी सांगितलं. त्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वित्त धोरण समितीची बैठक काल मुंबईत झाली. उद्या बँकेचं वित्त धोरण जाहीर होणार आहे. बँकेनं फेब्रुवारी २०२३ पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नसून, तो सहा पूर्णांक पाच टक्क्यांवर स्थिर राखला आहे. दरम्यान, रिझर्व्ह बँकेनं युपीआय लाइटची

मर्यादा ५०० रुपयांवरुन एक हजार रुपये केली आहे. मात्र, एकंदर मर्यादा पाच हजार असल्याचं बँकेनं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. या नवीन मर्यादा तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांना सुविधा पुरवण्यासाठी मुंबई महापालिकेनं जय्यत तयारी केली आहे. पालिकेनं चैत्यभूमी परिसरात नियंत्रण कक्ष उभारला असून रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, शौचालये अशा सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर मुख्य कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय करण्यात आली आहे. चैत्यभूमी जवळच्या समुद्रात जीवरक्षक बोटी, अग्निशमन यंत्रणाही तैनात करण्यात आली आहे. या वेळी पालिकेच्या जनसंपर्क विभागानं डॉ. आंबेडकर यांच्या जीवनपटावर आधारित छायाचित्र प्रदर्शन आयोजित केलं आहे.

**<><><><><>**

प्रयागराजमध्ये पुढच्या वर्षी होत असलेल्या महाकुंभ मेळ्यासंबंधित विविध कार्यक्रमांबाबत काल प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी प्रयागराज इथल्या आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. या बैठकीत आकाशवाणीचे संचालक प्रज्ञा पालीवाल, दूरदर्शनचे महासंचालक कंचन प्रसाद, दूरदर्शन वृत्त चे

महासंचालक कंचन प्रिया कुमार उपस्थित होते. यावेळी महाकुंभाच्या जागतिक प्रसारण आणि इतर कार्यक्रमांविषयी चर्चा झाली. हे सर्व अधिकारी आज कुंभमेळा परिसराची पाहणी करणार आहेत.

**<><><><><>**

फ्रान्सच्या राष्ट्रीय संसदेत अविश्वास ठराव मंजूर झाल्याने प्रधानमंत्री मिशेल बार्नियर यांचं सरकार अवघ्या तीन महिन्यात कोसळलं आहे. सत्ता स्वीकारल्यानंतर अवघ्या ३ महिन्याच्या काळातच बार्नियर यांचं सरकार कोसळलं. सोमवारी त्यांनी संसदेत मतदानाशिवाय वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करून घेण्याचा प्रयत्न केल्यानंतर संसदेतल्या ५७७ पैकी ३३१ खासदारांनी बार्नियर सरकारच्या विरोधात मतदान केलं होतं. बार्नियर यांनी सादर केलेला तंत्रज्ञान आधारित अर्थसंकल्प फ्रान्सची वाढती सुरक्षा आव्हानं आणि गुन्हेगारीचा सामना करण्यासाठी असमर्थ असल्याची टीका विरोधी पक्षाचे नेते मरिन ले पेन यांनी केली. बार्नियर यांनी आता राजीनामा देणं अपेक्षित असून त्यांचं मंत्रिमंडळ काळजीवाहू सरकार म्हणून काम करेल. फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युल मॅक्रोन आज फ्रेन्च संसदेला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

भूतान नरेश जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आणि महाराणी पेमा वांगचुक यांच आज दोन दिवसाच्या भारत दौऱ्यासाठी नवी दिल्लीत आगमन झालं. परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी त्याचं विमानतळावर स्वागत केलं. या दौऱ्यात भूतान नरेंश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार असून

परराष्ट्रमंत्री आणि इतर वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करणार आहेत. त्यांच्या दौऱ्याने भारत आणि भूतान यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ होतील असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

<><><><><>

बांगलादेशात अल्पसंख्याक समुदायावर सुरु असलेल्या हल्ल्यांच्या विरोधात बांगलादेशच्या माजी प्रधानमंत्री शेख हसीना यांनी बांगलादेशातील अंतरीम सरकारवर टीका केली आहे. न्यूयॉर्क मधल्या एका क्रार्यक्रमात दूरदृश्य प्रणालीनं दिलेल्या संदेशात त्यांनी म्हटल आहे की, मुहम्मद युनूस अल्पसंख्याकांच्या आणि हिंदूंच्या हिताचं रक्षण करण्यात अपयशी ठरले आहेत. बांगला देश सोडायला लागल्यानंतर शेख हसीना पहिल्यांदाच जाहीर कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

<><><><><>

अमेरिकेतली सर्वात मोठी आरोग्य वीमा कंपनी युनायटेड हेल्थकेअर चे मुख्य कार्यकारी अधिकारी ब्रायन थॉमसन यांची काल न्युयॉर्कमध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. एका चेहरा झाकलेल्या व्यक्तींन त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. थॉमसन यांची कट रचून हत्या करण्यात आल्याचं स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितलं. सुमारे ८१ अरब डॉलर्सची उलाढाल असलेल्या वीमाकंपनीची सुत्र थॉमसन यांनी २०२१ मध्ये हाती घेतली होती.

<><><><><>

ओमान झालेल्या पुरुषांच्या हॉकी ज्युनियर आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने विजेतेपद पटकावलं आहे. काल झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताने पाकिस्तानचा ५ - ३ असा पराभव केला. या संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिलेल्या भारतीय संघाने सलग तिसऱ्यांदा हे विजेतेपद पटकावलं आहे.

पुरुष हॉकी कनिष्ठ आशिया कप स्पर्धेत विजयी झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीय संघाचं अभिनंदन केलं. हा विजय भारतीय हॉकी संघासाठी ऐतिहासिक क्षण असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. खेळाडूंचं अतुलनीय कौशल्य, धैर्य आणि सांघिक कामगिरीच्या जोरावर भारतानं हा विजय साकारला, असं म्हणत प्रधानमंत्र्यांनी हॉकी संघाच्या भविष्याबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना ब्रिस्बेन इथं सुरु आहे. भारतीय संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. मात्र, भारतीय फलंदाज फारशी चमक दाखवू शकले नाहीत. भारताच्या हरमनप्रीत कौर, जेमिमा रॉड्रिग्ज, स्मृती मंधाना फारशी चमक न दाखवता माघारी परतल्या. त्यामुळे भारतीय संघ ३४ षटकांत सर्वबाद १०० धावा करू शकला. त्यानंतर फलंदाजीला उतरलेल्या ऑस्ट्रेलिया संघाची सलामीची फलंदाज फिबी लिचफिल्ड ३५ धावा काढून बाद झाली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या षटकात बाद धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**